# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०९/०४/२०१८**

## १)जबरी चोरी_:-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०८.०४.२०१८ रोजी चे १६.१५ वा. चे सुमारास लातुर फाटा रिलायंस ऑफीस जवळ नांदेड येथे यातील फिर्यादी हा पायी रिलायंस ऑफिस येथे येत असताना पाठी मागुन मो.सा. क्रमांक एम.एच.२६/ए.जी. ७००३, दुसरी मो.सा. क्रमांक एम.एच. २६/५२५४ व तिसरी मो.सा. एम. एच. २६/८२५४ वर आलेले पाच आरोपीने फिर्यादी सोबत झटापट करुन शर्टाचे वरचे खिशातील नगदी ४०००/-रुपये व सॅमसंग कंपणीचा मोबाईल किंमती ३०००/-रुपयाचा असा एकुण ७,०००/-रुपयाचा माल खंजरने डावे गालावर, दंडावर मारुन गंभीर जखमी करुन जबरीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी गजानन पि. वसंतराव गंदेवार, वय ३८ वर्षे व्यवसाय लक्ष्मी फायनांस वसुली, रा. बामणी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे नांदेड ग्रामीण** गुरनं ११९/२०१८ कलम ३९७, ३४ भादंवि व सह कलम ४/२५ आर्मस अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/ मोरे, मो.क्र. ९५९५८५१५८५** करीत आहेत.

## २) जनावर चोरी

**अर्धापुर :-** दिनांक ०७.०४.२०१८ चे २२.०० ते ०८.०४.२०१८ चे ०५.०० वा. चे दरम्यान मौजे दिग्रस शिवार यातील फिर्यादी ने शेतातील आखाडयावर म्हैस बैल बांधुन वारे वावधान सुटल्याने घरी गेले असता यातील नमुद आरोपीने फिर्यादीची म्हैस किंमती ५०,०००/- रुपयाची चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी भुजंगा पि. महादु तिडके, वय ४० वर्षे व्यवसाय शेती रा. दिग्रस, ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. अर्धापुर** गुरनं ६२/२०१८ कलम ३७९, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ /ब.नं.४५७ कदम मो.नं. ९८८१४७५००४** हे करीत आहेत.

## ३) मो. सा.चोरी :-

**विमानतळ :-** दिनांक ०८.०४.२०१८ रोजीचे ०२.०० ते ०९.०० चे दरम्यान शिवनगर नांदेड येथे यातील फिर्यादी हा त्याची हिरो प्रो कंपणीचे मो. सा. क्रमांक एम.एच. २६/ ए. झेड.-५१७८ किंमती ४०,०००/-रुपयाची घरासमोर लावलेली अज्ञात आरोपीने चोरुन नेऊन जाळुन टाकुन नुकसान केले. वगैरे **फिर्यादी किरण पि.जळबाजी कंधारकर, वय ३२ वर्षे व्यवसाय मजुरी रा. शिवनगर, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरनं ८१/२०१८ कलम ३७९, ४३५, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/९६७ गायकवाड, मो.क्र. ८८८८६२५५५३** हे करीत आहेत.

## ४) विनयभंग_ :-

**अ) शिवाजीनगर :-** दिनांक २८.०३.२०१८ रोजीचे १०.०० वा. चे सुमारास मस्त्य व्यवसाय कार्यालय विसावानगर, नांदेड येथे यातील आरोपीतांनी फिर्यादी महिलेस ऑफिस मध्ये बोलावुन वाईट हेतुने हात धरुन, शिवीगाळ करुन धक्का देवुन विनयभंग केला. वगैरे **४० वर्षीय महिला फिर्यादी** हिने दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. शिवाजीनगर** गुरनं ७१/२०१८ कलम ३५४, ५०४, ३४, भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/१५७१ सुर्यवंशी, मो.क्र. ०२४६२८२५६५२०** हे करीत आहेत.

**ब) भाग्यनगर :-** दिनांक ०७.०४.२०१८ रोजी चे १४.०० वा. चे सुमारास आदर्शनगर, नांदेड येथे यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी महिलेस लाथा बुक्याने मारहाण करुन, शिवीगाळ करुन, वाईट हेतुने हात धरुन, घरातुन हाकलुन देवुन विनयभंग केला. वगैरे **३२ वर्षीय महिला फिर्यादी** हिने दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. भाग्यनगर** गुरनं ८७/२०१८ कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६, ३४, भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२०१४ सिरसाठ, मो.क्र. ९४२३३०६२४५** हे करीत आहेत.

## ५) हयगयीने वाहान चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**कंधार :-** दिनांक ०५.०४.२०१८ रोजी चे २१.३० वा. चे सुमारास दिग्रस (खु) शिवारात कंधार ते जांब रोडवर, ता.कंधार जि. नांदेड येथे यातील **मयत नामे विठ्ठल उत्तम मोरे, वय २४ वर्षे रा. जांब (बु) ता. मुखेड जि. नांदेड** हा आरोपीचे टोयाटो कार क्रमांक एम. एच.-२४/ए. एफ-०२४४ मध्ये फिर्यादी व मयत असे बसुन नांदेड ते जांब जात असताना आरोपीने त्याचे ताब्यातील वाहान भरवेगात हयगय व निष्काळजीपणाने चालवुन रोडचे बाजुचे झाडास धडक देवुन फिर्यादीस गंभीर जखमी केले व यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण किशनराव गायकवाड, वय २४ वर्षे व्यवसाय मजुरी रा. जांब (बु). ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. कंधार** गुरन ६५/२०१८ कलम ३०४ (अ), २७९, ३३८, भादंवि कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/ भंडेसर, मो.नं. ९८२३१२२२८४** हे करीत आहेत.

## ६) पळवून नेले :-

**अर्धापुर :-** दिनांक ३०.३.२०१८ रोजी चे १७.३० वा.चे सुमारास स्वराज धाबा मालेगांव, ता. अर्धापुर जि. नांदेड येथे, यातील **फिर्यादीचा मुलगा नामे कृष्णा पंजाबराव ढोणे, वय २१ वर्ष व्यवसाय मजुरी रा. शहीदपुरा भगतसिंगरोड, नांदेड** यास चार अनोळखी इसमांनी चाकुचा धाक दाखवुन मो. सा.बसवुन त्यास अज्ञात स्थळी, आज्ञात कारणावरुन पळवून नेले. वगैरे **फिर्यादी वंदना भ्र. पंजाबराव ढोणे, वय ४० वर्षे व्यवसाय घरकाम रा.शहीदपुरा भंगतसिंगरोड, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. अर्धापुर** गुरनं ६१/२०१८ कलम ३६३, ३४, भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/ दंतुलवार, मो. नं. ९९२३४२२४२५** हे करीत आहेत.

## ७) बेकायदेशिररीत्या देशी दारु व शिंदी बाळगुन मिळुन आला :-

**बिलोली :-** दिनांक ०८.०४.२०१८ रोजी चे १५.३० वा. चे सुमारास फिर्यादीचे घरासमोर मौजे कासराळी दुरक्षेत्र सगरोळी, ता. बिलोली जि. नांदेड येथे यातील आरोपी महीलेने विनापरवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल.चे १० बॉटल अंदाजे किंमत ५२०/- रुपये व शिंदी २०० लीटर किंमती २,०००/- रुपये असा एकुण २,५२०/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वत:च्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी सपोउपनि/रामकिशन नागोराव गर्दनमारे, ने. पो. स्टे. बिलोली** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. बिलोली** गुरन ७५/२०१८ कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२२४९ तेलंगे, मो.क्र. ०२४६५-२२३३३३** हे करीत आहेत.

## ८) तिर्रट नावाचा मटका जुगार :-

**सोनखेड :-** दिनांक ०८.०४.२०१८ रोजी चे १७.४० वा. चे सुमारास जि.प. शाळेच्या पाठीमागे मौजे बामणी, ता. लोहा जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या पत्यावर पैसे लावुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी २,५००/- रुपयाचा माल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोना/२०३८ कैलास विठ्ठलराव बोरगांवे, ने. पो. स्टे. सोनखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. सोनखेड** गुरन. ४०/२०१८ कलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१६२७ तांबोळी, मो.नं. ८८८८८४०९२८** हे करीत आहेत.

## ९) गळफास घेवुन आकस्मात मृत्यु :-

**अ) तामसा :-** दिनांक ०८.०४.२०१८ रोजी चे १७.०० वा. चे पुर्वी ,नांदेड येथे, यातील **मयत नामे रामदास पि.सोपान कोरपल्ले, वय ३४ वर्षे व्यवसाय शिक्षक रा.तामसा, ता.हदगांव जि.नांदेड** हा त्याचे राहते घरी आर.सी.सी.च्या छतास, लोखंडी हुकास नायलोन दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार सावित्रीबाई भ्र.रामदास कोरपल्ले, वय ३२ वर्षे व्यवसाय नौकरी कृषी सहाय्यक रा.तामसा, ता.हदगाव जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.तामसा** आ.मृ. १२/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास सपोउपोनि/आर.डी.पवार, मो.क्र.९८२३८७९७१३** हे करीत आहेत.

**ब) मांडवी :-** दिनांक ०८.०४.२०१८ रोजी चे ०४.०० ते ०९.०० वा. चे दरम्यान ऋषी महाराज मंदिर जवळील साईबाबा मंदिरा समोरील सेडमध्ये ता.किनवट जि.नांदेड येथे, यातील **मयत नामे सुजय गेमसिंग डोंगरे, वय २१ वर्षे रा.मांडवी, ता.किनवट जि.नांदेड** हा त्याचे वडीलाचे मोठे भावाच्या नांवे असलेल्या बँकेचे कर्ज व नापीकीस कंटाळुन गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार गेमसिंग तोईराम डोंगरे, वय ४९ वर्षे रा.मांडवी, ता.किनवट जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.मांडवी** आ.मृ. ०४/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास सपोउपोनि/कोळी, मो.क्र.९०४९३९२९२५** हे करीत आहेत.


**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड

फोन नंबर ०२४६२-२४४४७४